**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १** **<u>नि.फौ.ख.क्र. ०९/२०१८</u>**

महाराष्ट्र शासन वि. पवन+२

**नि.क्र. ३८**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | विजय दिनकर पाटील, |
| वय | – | ३४ वर्षे, |
| व्यवसाय | – | मजुरी, |
| राहणार | – | सावरगाव, ता. नरखेड, जि. नागपूर |

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.जी.बी. राऊत यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–</u>**

ROHAN VIJAYKUMAR THAYIL

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL Date: 2025.08.19 03:39:59 -0400

दि. २२/१२/२०१७ रोजी पोलिसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी समन्स दिले नव्हते. आता मला दि. २२/१२/२०१७ चे समन्स दाखविण्यात येत आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहिही माहिती नाही. त्यावरती माझी सही आहे. पोलीसांच्या आदेशावरुन मी त्यावरती सही केली. सही पुरता **निशाणी ३९** देण्यात येत आहे. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात येत आहे. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष तयार केले नाही. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा मला वाचून दाखविले नाही. त्यातील मजकूरा बाबत मला काहीही माहिती नाही. त्यावरती माझी सही आहे. मी पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यावरती सही केली. सही पूरता **निशाणी क्र. ४०** देण्यात येत आहे. आता मला दि. २४/१२/२०१७ रोजीचा सकाळी ०९:३० ते ०९:४५ वाजेचा जप्ती पंचनामा दाखविण्यात येत आहे. पोलिसांनी जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार केले नाही. पोलिसांनी जप्ती पंचनामा मला वाचून दाखविले नाही. त्यातील मजकूरा बाबत मला काहीही माहिती नाही. त्यावरती माझी सही आहे. मी पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यावरती सही केली. सही पूरता **निशाणी क्र. ४१** देण्यात येत आहे.आता मला दि. २४/१२/२०१७ रोजीचा सकाळी १०:०० ते १०:१५ वाजेचा जप्ती पंचनामा दाखविण्यात येत आहे. पोलिसांनी जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार केले नाही. पोलिसांनी जप्ती पंचनामा मला वाचून दाखविले नाही. त्यातील मजकूरा बाबत मला काहीही माहिती नाही. त्यावरती माझी सही आहे. मी पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यावरती सही केली. सही पूरता **निशाणी क्र. ४२** देण्यात येत आहे.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्यमान सहाय्यक सरकारी**

अभियोक्तांनी सदर साक्षीदार उलटतपासणीची परवानगी मागितली. साक्षीदारास उलटतपासणीची परवानगी देण्यात येत ).

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २२/१२/२०१७ चा घटनास्थळ पंचनामा फिर्यादीच्या घरासमोर माझ्या समक्ष तयार करण्यात आला व मला ते पोलीसांनी वाचून दाखविले आणि त्यानंतर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी दि. २४/१२/२०१७ रोजी माझ्या समक्ष आरोपी क्र. १ पवन मेश्राम कडून एक लाकडी काठी जप्त केली तसेच आरोपी क्र. २ आश्वीन मेश्राम कडून एक बासाची लाकडी काठी जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी पुर्वीपासून ओळखत असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री ए. एन. नारनवरे यांच्यामार्फत उलटपासः–**

**उलटतपास नाकारले.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.08.19 03:40:10 -0400

ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.08.19 03:39:49 -0400

(रोहन विजयकुमार थाईल)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १९/०८/२०२५.**

**दिनांकः १९/०८/२०२५**

**माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 0 २ मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे. व Explanation V, Paragraph No. 16, Chapter VI of Criminal Manual प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.**

साक्षीदाराची सही
(विजय दिनकर पाटील)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(जी. बी. राउत)